दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३६३ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.१९ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ४ नोव्हेंबर रोजी मोठा स्फोट होणार;आम्ही आघाडी आणि युती दोघांचाही एन्काउंटर करणार-आ.बच्चू कडू

नागपूर (वृत्तसंस्था)–विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. एकीकडे महाविकास आघाडी आणि महायुतीत सामना रंगणार असून तर दुसरीकडे प्रहारचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी तिसऱ्या आघाडीच्या माध्यमातून वेगळी चूल मांडल्याचे चित्र आहे. त्यातच बच्चू कडू यांनी काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतल्याची माहिती समोर आली होती. याबाबत विचारले असता बच्चू कडू यांनी चार नोव्हेंबरला मोठा स्फोट होणार' असे सांगितले.

महाविकास आघाडी आणि महायुती दोघांनाही जनता कंटाळली आहे. दोन्ही युती-आघाडीत जागा वाटपामध्ये तिढा आहे. भाजप आणि काँग्रेस एकच आहेत. अर्थकारणात काही बदल झालेला नाही. आम्ही मुद्द्यावर लोकांना घेऊन जाऊ. चार तारखेला पूर्ण चित्र स्पष्ट होईल आणि मोठा स्फोट होईल. महाशक्ती हा स्फोट करणार आहे, असे ते म्हणाले.राजन तेली यांनी गुरुवारी भाजप सावंतवाडी विधानसभा प्रमुख पदाचा आणि सदस्य पदाचा राजीनामा दिला. यानंतर ते ठाकरे गटात प्रवेश करणार आहे. नारायण राणेकडून भाजपमध्ये आपले खच्चीकरण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. राजन तेली किंवा त्यांच्याबद्दल मला माहिती नाही.मुख्यमंत्री शिंदेंची भेट घेतली का? असे विचारले असता, मुख्यमंत्र्यांशी माझी चर्चा झाल्याची न्यूज तुम्ही चालवली. भेट कशी झाली मला माहिती नाही, मी मुख्यमंत्र्यांच्या घरी गेलोच नव्हतो, असे स्पष्टीकरण त्यांनी दिले आहे. तर आम्ही आघाडी आणि युती दोघांचाही एन्काऊंटर करणार, असेही बच्चू कडू यांनी सांगितले.



### ४ नोव्हेंबरला मोठा स्फोट पाहायला मिळणार

चांगले उमेदवार आणि चांगले मतदार संघ आमच्याकडे आलेले दिसणार आहे. युती आणि आघाडी या दोघांना पहिले पाडायचे आहे. जरांगे पाटील यांच्या संबंधात माझे काही बोलणे झाले नाही. उमेदवारांच्या ताकदीपेक्षा राजकारण महत्त्वाचे आहे. ४ नोव्हेंबरला सगळे स्पष्ट होईल आणि मोठा स्फोट पाहायला मिळणार आहे. उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतरच पिक्चर क्लिअर होईल. माझ्या मतदारसंघातील लोकांचा माझ्यावर विश्वास आहे आणि मी तिथूनच लढणार, असे म्हणत बच्चू कडूंनी विधानसभेसाठी शड्डू ठोकला.

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संगमनेरातून ४२ लाखांची रोकड जप्त


**राहुरी । शहाजी दिघ**

आचारसंहिता लागू झाल्यानंतर संगमनेर हद्दीत होणाऱ्या रोखीच्या व्यवहारांवर प्रशासनाने करडी नजर ठेवली आहे. गुरुवारी गुजरात राज्यातील रहिवासी असलेल्या दोन व्यक्तींकडून ४२ लाख १५ हजार रुपयांची रोकड स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संगमनेर शहरातून जप्त केली. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

अटक करण्यात आलेल्यांची नावे मुकेशकुमार रमेशभाई पटेल (वय ३६) आणि धवलकुमार जसवंतभाई पटेल (वय ३२, सध्या रा. पार्श्वनाथ गल्ली, संगमनेर, मूळ रा. गुजरात) अशी आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अवैध व्यवहारांवर लक्ष ठेवत असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना रोख रक्कम लपवून ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली.

पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, संगमनेर शहरातील एका दुकानाच्या वरच्या मजल्यावर मोठ्या प्रमाणात रोकड साठवून ठेवली असल्याचे समजले. त्यानंतर स्थानीय गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ छापा टाकून दोन आरोपींच्या ताब्यातून ४२ लाख १५ हजार रुपयांची रोकड हस्तगत केली.

पोलिस तपासात आरोपींनी दिलेल्या कबुलीनुसार,



जप्त केलेली रक्कम भावेर रमाभाई पटेल (रा. पार्श्वनाथ गल्ली, संगमनेर) आणि आशिष सुभाष वर्मा (रा. अहिल्यानगर) यांची असल्याचे स्पष्ट झाले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक तुषार धाकराव, अतुल लोटके, अमृत आढाव,आणि मनोज गोसावी यांच्या पथकाने केली.

सध्या पोलिसांकडून या रकमेचा अधिक तपास सुरू आहे. तसेच हवाल्याच्या व्यवहाराशी संबंधित इतर कोणताही गैरव्यवहार उघड होतो का, याचीही चौकशी करण्यात येत आहे

# आ.सतीश चव्हाण यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमधून सहा वर्षांसाठी निलंबन

**मुंबई । प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षबदल आणि राजकीय हालचालींना वेग आला आहे. याच दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाने मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांना पक्षविरोधी काम केल्याचा ठपका ठेवून सहा वर्षांसाठी निलंबित केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी याबाबतचा अधिकृत आदेश जारी केला आहे.



सतीश चव्हाण यांनी पक्षातून निलंबनाच्या आदेशानंतर लगेचच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांची भेट घेतली. या चर्चेने राजकीय वर्तुळात चव्हाण शरद पवार गटात सामील होण्याची चर्चा सुरू झाली आहे. चव्हाण सध्या विधान परिषदेचे आमदार असून, ते गंगापूर विधानसभा मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत. नुकत्याच दोन दिवसांपूर्वी, सतीश चव्हाण यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली होती. त्यांनी म्हटले होते की, महायुती सरकारने बहुजन समाजाला न्याय दिला नाही. त्यांनी पत्र लिहून सरकारच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली होती आणि आरक्षणाच्या मुद्द्यांवर सरकार अपयशी ठरल्याचा आरोप केला होता.

आ. संजय शिरसाट यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, सतीश चव्हाण यांनी अनेक कामांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना गंगापूर मतदारसंघात बोलावून विकासकामे केली. कामे करून घेतल्यानंतर सरकारवर टीका करणे योग्य नाही. त्यांनी असा आरोप केला की, चव्हाण यांनी निवडणूक लढविण्यासाठी राजकीय हालचाल केली आहे.

निलंबनानंतर चव्हाण यांच्या राजकीय भविष्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ते शरद पवार गटात सामील होतात की स्वतंत्रपणे निवडणूक लढवतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# वीज पडून शेतमजूर गंभीर जखमी

**वरोरा । प्रतिनिधी**


सध्या सोयाबीन कापणीचा हंगाम सुरू आहे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतमजूर सोयाबीन कापण्यास लागले आहेत. आज, १८ ऑक्टोबर २०२४ रोजी, शेगाव बु. येथून जवळ असलेल्या शेगाव खुर्द परिसरातील एका शेतात दुपारच्या सुमारास अचानक वीज गर्जना आणि पाऊस सुरू झाला. यामुळे शेतातील शेतकरी आणि शेतमजूर यांची एकच तारांबळ उडाली. या घटनेत विजु उद्धव जांभुळे (वय ४५ वर्षे) आणि त्यांच्या शेतात काम करणारी शेतमजूर मंजुषा प्रदीप क्षीरसागर (वय ४० वर्षे) गंभीर रित्या जखमी झाली. दोन्ही जखमींना तात्काळ शेगाव बु. येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले; परंतु तिथे योग्य सुविधा नसल्यामुळे त्यांना वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. तिथे त्यांच्या उपचारास प्रारंभ करण्यात आला आहे.सोयाबीन कापणीच्या हंगामाला जोर चढल्याने व परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे ताण वाढलेले आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता आणि तणाव वाढला आहे.

# कल्याण स्टेशनजवळ लोकल ट्रेनचा डबा घसरला;प्रवाशांमध्ये गोंधळ,वाहतूक प्रभावित

**मुंबई । मनोज उतेकर**

मध्य रेल्वेवर पुन्हा एकदा गंभीर अपघात झाला आहे, ज्यामुळे प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. कल्याण स्टेशनजवळ लोकल ट्रेनचा शेवटचा डबा घसरल्यामुळे मध्य रेल्वेची वाहतूक गंभीररीत्या विस्कळीत झाली आहे. यामुळे प्रवाशांना मोठा गोंधळ आणि अडचणीचा सामना करावा लागत आहे.गुरुवारी रात्री, टिटवाळाहून मुंबईकडे ( सीएसएमटी) निघालेल्या लोकल ट्रेनच्या डब्याने कल्याण स्थानकाजवळ, दोन नंबर प्लॅटफॉर्मजवळ रुळावरून घसरण्याची घटना घडली. अपघातामुळे स्थानक परिसरात तातडीने वर्दळ वाढली आणि स्थानकावर उपस्थित प्रवाशी घाबरले.

घटनेची माहिती मिळताच मध्य रेल्वेचे कर्मचारी घटनास्थळी तात्काळ दाखल झाले. डबा पुन्हा रुळावर आणण्यासाठी बचाव कार्य सुरू करण्यात आले. मध्य रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी



स्वप्नील नीला यांनी सांगितले की, या घटनेत कोणतीही हानी किंवा प्रवाशांना इजा झालेली नाही, आणि सुरक्षा व्यवस्थेमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येईल.अपघातामुळे मध्य रेल्वेच्या मार्गावर वाहतूक प्रभावित झाली आहे, परंतु दुसऱ्या ट्रॅकवरून लोकल सेवा सुरु ठेवण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांना दिलेल्या सूचनांनुसार, अपघातामुळे होणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत.

प्रवाशांमध्ये गोंधळ आणि चिंतेचे वातावरण आहे, आणि काही प्रवाशांनी रेल्वे प्रशासनाच्या अपघाताच्या कारणांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. स्थानकावर उपस्थित असलेल्या प्रवाशांचे म्हणणे आहे की, अशा घटनांना आळा घालण्यासाठी रेल्वे प्रशासनाने योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे. या घटनेने मध्य रेल्वेच्या सुरक्षिततेच्या बाबतीत पुन्हा एकदा प्रश्न उपस्थित केला आहे. रेल्वे प्रशासनाने योग्य तपासणी करून या प्रकारच्या अपघातांना आळा घालण्यासाठी आवश्यक पाऊले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

# सरकार आल्यास दीड ऐवजी ३ हजार देऊ असे सांगा;श्याम मानव यांचा आघाडीच्या नेत्यांना सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधानसभा निवडणुकीदरम्यान राज्यात आता मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची चांगलीच चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना हलक्यात घेऊ नका, या योजने विरोधात न बोलता महाविकास आघाडीचे सरकार आल्यास आम्ही महिलांना दीड हजार रुपयांऐवजी दोन हजार रुपये देऊ, असे सांगा, असा सल्ला अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष श्याम मानव यांनी महाविकास आघाडीला दिला आहे.

राज्यातील महायुती सरकारच्या वतीने घोषणा करण्यात आलेल्या लाडकी बहिणी योजनेमुळे राज्यातील महिलांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून येत आहे. सुरुवातीच्या काळात ही योजना फसवी असल्याचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आरोप केले होते. त्यानंतर या योजनेचे पैसे आता केवळ निवडणुकीपुरते भेटतील, असे आरोप करण्यात येत आहे. मात्र त्याला महायुती सरकारच्या वतीने देखील प्रत्युत्तर देण्यात येत आहे. लाडकी बहीण योजनेची लोकप्रियता पाहता याचा विधानसभा निवडणुकीत महायुतीला फायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आता या योजनेवर टीका न करता लाडक्या बहिणींचे कौतुक करा, या योजनेच्या माध्यमातून आमचे सरकार आल्यास आम्ही महिन्याला दोन हजार रुपये देऊ असे सांगा.

# अजित पवार यांच्या मध्यस्थीनंतर दीपक मानकरांचा राजीनामा मागे



**पुणे । मनोज उतेकर**

विधानपरिषदेसाठी संधी न मिळाल्याच्या कारणावरून राजीनामा देण्याचा निर्णय जाहीर करणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष दीपक मानकर यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा केल्यानंतर आपला राजीनामा मागे घेतला आहे. पवार यांनी पाठीशी उभे राहण्याचा शब्द दिल्याने आणि आगामी काळात न्याय मिळेल, अशी ग्वाही दिल्यामुळे त्यांनी पक्षाचे काम पुन्हा जोमाने सुरू करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. मानकर यांनी शुक्रवारी पवार यांची भेट घेतल्यानंतर लवकरच विधानसभा निवडणूक नियोजनासाठी शहर पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले. पवार यांनी स्पष्ट केले की, पक्षातील कोणाचाही राजीनामा मंजूर केला जाणार नाही आणि सर्व पदाधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या सांभाळून काम करावे, असे निर्देश दिले आहेत.

मानकर यांच्या समर्थकांनी विधानपरिषदेत संधी न मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर राजीनाम्याचे सत्र सुरू केले होते. दीपक मानकर यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषदेत पक्षावर नाराजी व्यक्त करत राजीनामा देणार असल्याचे जाहीर केले होते. प्रामाणिकपणे काम करूनही पक्ष विचारत नसेल, तर दुसरा पर्याय राहणार नाही, असे त्यांनी सांगितले होते.

अजित पवार यांच्या भेटीनंतर मानकर यांनी आपला निर्णय बदलत राजीनामा मागे घेतला. आगामी काळात तुम्हाला नक्की न्याय दिला जाईल, असा शब्द पवारांनी दिला असल्याचे मानकर यांनी सांगितले. यानंतर त्यांनी पक्षाचे काम अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. विधानपरिषदेसाठी संधी न मिळाल्यानंतरही पक्षासाठी प्रामाणिकपणे काम सुरू ठेवणार असल्याचे मानकर यांनी स्पष्ट केले. लवकरच शहर पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करून निवडणूक नियोजनास गती दिली जाईल, असेही त्यांनी सांगितले

# नवभारत विद्यालय मूलने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ मध्ये द्वितीय क्रमांक पटकावला

**मूल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत राबवण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ अभियानात नवभारत विद्यालय तथा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय, मूलने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. ही शाळा माजी खासदार स्व. वि. तु. नागपुरे साहेब यांच्या कार्यान्वयनात ८४ वर्षांपासून ग्रामीण, आदिवासी, शेतकरी आणि गरीब वर्गातील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण प्रदान करणारी मूळ तालुक्यातील पहिली नामांकित सेमी इंग्रजी माध्यमांची शाळा आहे.

नवभारत विद्यालयाने वर्ग ५ ते १२ पर्यंत सेमी इंग्रजी, विज्ञान आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. या यशाबद्दल शाळेला दोन लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात येणार आहे.



शाळेने शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास साधता येतो. शाळेचे ध्येय आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरातून विद्यार्थ्यांना माहिती, विज्ञाननिष्ठ, पुरोगामी विचार व कौशल युक्त बनविणे आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा-२ अभियानात शाळेने अनेक उपक्रम राबवले आहेत. यात डिजिटल शाळा, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रगती, व्यक्तिमत्व विकास, क्रिडा व कला क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी, परिसर स्वच्छता, आरोग्य तपासणी, आपत्ती व्यवस्थापन आणि इको क्लब यांचा समावेश आहे. या उपक्रमांमुळे शाळेने तालुक्यातून द्वितीय क्रमांक मिळविला आहे.

शाळेच्या यशाबद्दल शाळेचे संस्थाध्यक्ष ड. अनिलराव वैरागडे, उपाध्यक्ष ऍड. प्रणव वैरागडे, सचिव शशिकांत धर्माधिकारी, सहसचिव कापगते साहेब, पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सौ. वर्षा पिपरे मॅडम, शिक्षण विस्तार अधिकारी कुमरे साहेब व केंद्रप्रमुख प्रमोद कोरडे यांनी अभिनंदन केले आहे.सदर अभियानासाठी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य अशोकराव झाडे, ज्येष्ठ शिक्षक गुरुदास चौधरी, निलेश माथनकर, भारत सलाम, राजु बोढे, वर्षा भांडारकर यांचे विशेष सहकार्य लाभले. या यशामुळे नवभारत विद्यालय मूळने आपल्या गुणवत्तेचा ठसा ठोकला आहे आणि पुढील काळातही यशस्वी कार्य करण्याची आशा व्यक्त केली आहे.

## मोर्शी विधानसभा क्षेत्रात हर्षवर्धन देशमुख यांचा निवडणूक लढण्यास नकार

**वर्धा । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेता हर्षवर्धन देशमुख यांनी मोर्शी विधानसभा निवडणुकीत सहभागी न होण्याचा निर्णय घेतल्याची माहिती दिली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, मी मोर्शी विधानसभा निवडणूक लढणार नाही. देशमुख यांनी विक्रम ठाकरेच्या संभाव्य उमेदवारीसाठी समर्थन दर्शवताना सांगितले आहे, जर विक्रम ठाकरेला टिकिट मिळाले, तर मी त्याच्या प्रचारासाठी तयार आहे.मोर्शी निर्वाचन क्षेत्रातील विद्यमान आमदार देवेन्द्र भुयार यांच्या दगाबाजीमुळे या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. देशमुख यांनी २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी आपले नाव चर्चेत असले तरी निवडणूक लढण्यास नकार देत आपल्या वयाचे कारण दिले आहे. माझे वय ७४ वर्षांपेक्षा अधिक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

देशमुख यांच्या मते, मोर्शीमध्ये भुयारांना टक्कर देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने दमदार उमेदवार निवडावा लागेल. गेल्या निवडणुकीत त्यांनी भुयारांना समर्थन दिले





होते, परंतु आता विक्रम ठाकरेच्या प्रचारात सामील होण्याची तयारी दर्शवली आहे.

महाविकास आघाडीच्या तिकिटासाठी विक्रम ठाकरे एक प्रमुख दावेदार मानले जात आहेत, मात्र त्यांच्या संपर्कात अडचणी आल्या आहेत. मोर्शी आणि वरूडमध्ये चाललेल्या चर्चांनुसार, या निवडणुकीत विद्यमान आमदार भुयार, विक्रम ठाकरे आणि इतर काही नेत्यांचा सामना होणार आहे.देशमुख यांनी जोरदारपणे सांगितले की, मी शरद पवार यांच्याकडून टिकिट मागितले तरी ते मला नकार देणार नाहीत. त्यांच्या या भूमिकेमुळे मोर्शीच्या राजकारणात एक नवा वळण येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

देशमुख यांच्या निर्णयामुळे आगामी विधानसभा निवडणुकीतील राजकीय वातावरण अधिक चुरशीचे होण्याची शक्यता आहे. त्यांच्या समर्थनामुळे विक्रम ठाकरेच्या उमेदवारीला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा आहे, त्यामुळे मोर्शी विधानसभा क्षेत्रातील निवडणूक लढतीत नवा कौल येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मोर्शी विधानसभा क्षेत्रात ताणतणाव आणि चुरशीच्या वातावरणात, हर्षवर्धन देशमुख यांचा निर्णय नवा गाजावाजा करणारा ठरू शकतो, ज्यामुळे इतर उमेदवारांच्या रणनीतीतही बदल होण्याची शक्यता आहे.

## संत रोहिदास गर्जना महिला मंडळाकडून कोजागिरी पौर्णिमा जल्लोषात साजरी

**गोरेगाव । प्रतिनिधी**

संत रोहिदास गर्जना महिला मंडळाने १६ ऑक्टोबर रोजी कोजागिरी पौर्णिमेचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केला. सामाजिक बांधिलकी जपत, प्रत्येक सण जल्लोषात साजरा करण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या या मंडळाने यंदाची कोजागिरीही विशेष आकर्षण ठरली.



शरद पौर्णिमेची रात्र वर्षातील सर्वाधिक सुंदर आणि शुभ रात्रींपैकी एक मानली जाते. जनमानसात श्रद्धा आहे की, या दिवशी महालक्ष्मी सुखसमृद्धीचे वरदान देत भूतलावर फिरते. या संकल्पनेप्रमाणे, जागृत राहणाऱ्यांना महालक्ष्मीचा विशेष आशीर्वाद लाभतो. संत रोहिदास गर्जना कुटुंबाच्या महिलांनीही या परंपरेचा आनंद घेत या सणाचे महत्त्व मनापासून जोपासले.

पौराणिक कथेनुसार, शरद पौर्णिमेच्या दिवशी माता लक्ष्मीचा जन्मदिवस मानला जातो. चंद्राच्या अमृतमयी किरणांनी पावन मानलेले दूध नैवेद्य म्हणून चंद्राला अर्पण करणे आणि नंतर त्याचा प्रसाद घेणे ही प्रथा आहे. याच परंपरेनुसार, मंडळातील महिलांनी पौर्णिमेच्या रात्री चंद्राची आणि महालक्ष्मीची पूजा करून सण साजरा केला.

संत रोहिदास गर्जना मंडळाच्या वतीने रात्रीच्या भोजनाची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. जेवणानंतर महिलांनी गरबा नृत्य आणि नाचगाण्याचा आनंद घेतला. हा जल्लोष रात्री १२.३० पर्यंत सुरू होता. महिलांच्या एकत्र येण्याने आणि सामूहिक पूजेने सणाला विशेष रंगत आली. यानंतर मसाला दुधाचा आनंद घेत सगळ्यांनी कोजागिरी साजरी केली.

कोजागिरीच्या या उत्सवाला माजी पंचायत समिती सदस्य मंगेश कदम आणि गोरेगाव विभाग प्रमुख दिनेश हरवंडकर यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच रोशन डीजे यांनी साऊंड सिस्टिमची व्यवस्था करून कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला. संत रोहिदास गर्जना महिला मंडळाच्या या उत्साही सणामुळे गोरेगाव परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आणि एकत्रीत सण साजरा करण्याचा आदर्श यानिमित्ताने ठेवल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

## यारी दोस्ती ग्रुपच्या सदस्याचे रक्तदान: गरोदर मातेला दिले जीवनदान

**जव्हार । जितेंद्र मोरघा**

खुदेड येथील सपना गायकवाड या गरोदर रुग्णाला प्रसूतीसाठी धुंदलवाडी येथील वेदांत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यावेळी त्यांना इ+ गटाच्या रक्ताची नितांत गरज भासत होती. परंतु वेळेवर कुठेही रक्त उपलब्ध न झाल्याने कुटुंबीय चिंतेत होते. अनेक ठिकाणी शोध घेऊनही रक्त मिळत नसल्याने त्यांनी अखेर 'यारी दोस्ती ग्रुप'शी संपर्क साधला.

गंभीर परिस्थिती पाहता तात्काळ डोनरची आवश्यकता होती. यारी दोस्ती ग्रुपच्या आवाहनाला प्रतिसाद देत जितगाव येथील सुनिल दसवत यांनी पुढाकार घेतला आणि निस्वार्थ भावनेने रक्तदान केले. रुग्णाशी कोणतेही नाते नसतानाही सामाजिक जबाबदारी म्हणून केलेल्या या कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सध्याच्या काळात सोशल मीडियाचा योग्य वापर करत यारी दोस्ती फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य, हे संस्थेचे कार्य समाजासाठी नवा आदर्श ठरले आहे. या ग्रुपच्या सदस्यांनी नेहमीच रक्तदान आणि अन्य सामाजिक कार्ये करून बंधुभाव, एकात्मता आणि माणुसकीचे मूल्य जिवंत ठेवले आहेत. संकटात एकमेकांना मदत करणे हीच खरी मानवता असून, यारी दोस्ती ग्रुपने या मूल्यांचे दर्शन घडवले आहे.



रक्तदानामुळे संकटसमयी गरोदर मातेला जीवनदान मिळाले. या सेवेसाठी रुग्णाच्या कुटुंबीयांनी यारी दोस्ती ग्रुप तसेच रक्तदाता सुनिल दसवत यांचे मनःपूर्वक आभार मानले. यारी दोस्ती ग्रुपच्या या कार्यामुळे समाजात माणुसकीचा संदेश देण्याचे मोठे कार्य घडत असून, त्यांचे हे सामाजिक योगदान इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

## राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात लासुर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य मनाजी पाटील मिसाळ यांची खासदार लंके यांच्याशी चर्चा



**वैजापूर । प्रतिनिधी**

१८ ऑक्टोबर रोजी पारनेर येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनात वैजापूर तालुक्यातील लासुर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे गटनेते मनाजी पाटील मिसाळ यांनी उपस्थिती लावली.

प्रदर्शनाच्या निमित्ताने मनाजी पाटील मिसाळ यांनी खासदार लंके यांच्याशी विविध प्रलंबित कामांबाबत चर्चा केली. यामध्ये तालुक्याच्या विकासाच्या योजना, शेतकऱ्यांच्या समस्या आणि स्थानिक प्रकल्पांवर विशेष चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

या भेटीवेळी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे वैजापूर तालुक्यातील पदाधिकारी देखील उपस्थित होते. त्यांनी तालुक्यातील प्रलंबित विकासकामे आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले. राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनामुळे विविध क्षेत्रातील नेत्यांना एकत्र येऊन संवाद साधण्याची संधी मिळाली असून, या चर्चांमुळे तालुक्याच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## धनंजय मुंडेंच्या पत्नीच्या कारला अपघात

**पुणे (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते तथा बीड जिल्ह्याचे पालकंत्री धनंजय मुंडे यांच्या पत्नीच्या कारला भीषण अपघात झाला आहे. पुणे– सोलापूर महामार्गावर पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. सोरतापवाडी या ठिकाणी ट्रॅव्हल्सने राजश्री मुंडे यांच्या कारला धडक दिली. या अपघातात राजश्री मुंडे किरकोळ जखमी झाल्या आहे. त्यांच्यावर उपचार करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे पुणे-सोलापूर महामार्गावर प्रवास करत होत्या. त्या बीडहून मुंबईकडे जात असताना त्यांची कार सोरतापवाडी या ठिकाणी आल्यानंतर एका खासगी ट्रॅव्हल्स बसने त्यांच्या कारला धडक दिली. ही धडक इतकी जोरात होती की, राजश्री मुंडेंच्या कारच्या समोरच्या भागाचे मोठे नुकसान झाले आहे. पहाटेच्या सुमारास हा अपघात घडला. अपघातानंतर महामार्गावर काही वेळासाठी वाहतूक खोळंबली होती. प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही वाहनांची वेगाने धडक झाल्यामुळे हा भीषण अपघात झाला. या अपघाताचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. दोन्ही वाहनांचा वेग जास्त असल्याने हा अपघात झाल्याचे सांगितले जात आहे.या अपघातात धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे या किरकोळ जखमी झाल्या आहेत. त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार झाले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस अपघातस्थळी दाखल झाले. पोलिसांसह आसपासच्या नागरिकांनी अपघातग्रस्तांना मदतकार्य केले.

# वाहनासह ३५ लाखांचा प्रतिबंधित सुगंधित माल जप्त

### निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई;जिल्ह्याच्या बॉर्डरवर पोलिसांची तैनाती

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हा प्रशासन व पोलिस विभाग क्शन मोडवर आले आहे. व्याहार्ड (खुर्द) येथे आंतरजिल्हा बॉर्डरवर लावण्यात आलेल्या एस.एस.टी. चेक पोस्टवर प्रतिबंधित ३५ लाखांचा माल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली असून जिल्ह्याच्या सीमेवर पोलिसांची तैनाती वाढविण्यात आली आहे.शुक्रवारी (दि. १८) सकाळी आदर्श आचारसंहितेच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी, जुगार प्रतिबंध, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु तसेच इतर अवैध धंद्यांवर कार्यवाही करण्यासाठी सावली पोलिस स्टेशन परिसरात स्थानिक गुन्हे शाखा चंद्रपूर येथील अधिकारी व अंमलदार पेट्रोलिंग करीत होते. यावेळी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर एक पांढरे रंगाची आयसर क्रमांक – सी.जी.– ०७ सी.क्यु ४६०२ मधून

महाराष्ट्रामध्ये प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखु व पानमसाला या अन्नपदार्थाच्या विक्रीकरीता गडचिरोली ते चंद्रपूर अशी अवैद्यरित्या वाहतूक करणार आहे, अशी खात्रीलायक माहिती प्राप्त झाली. एसएसटी चेक पोस्ट व्याहाड (बुज) येथे नाकाबंदी करून सदर वाहनाची तपासणी केली.यावेळी वाहनातून लोखंडी तारेच्या बंडल खाली लपवन ठेवलेला महाराष्ट्रामध्ये प्रतिबंधीत असलेला मजा १०८ संगधित हुक्का, शिशा तंबाखुचे २०० ग्रूम वजनाचे १६८० बॉक्स, ५० ग्रॅम वजनाचे १८०० बॉक्स एकूण किंमत १९ लक्ष १३ हजार ८०० रुपये व वाहनाची किंमत १५ लक्ष रुपये असे एकूण ३४ लक्ष ९३ हजार ८०० रुपयांचा माल पंचनामा करून जप्त करण्यात आला आहे. जप्त वाहनाचे चालक १) इरफान कुरेशी मुस्तफा कुरेशी (वय २७) रा. भिलाई, छत्तीसगड २) संतोप कुमार सुंदर सिंह (वय ४७) रा. डिडरी, मध्यप्रदेश यांच्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक दीपक कांकेडवार करीत आहे.सदरची कार्यवाही जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधिक्षक रिना जनबंधु, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. भगत यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक महेश कोंडावार, सहायक पोलिस निरीक्षक दीपक कांकेडवार, संतोप निंभोरकर, पोलिस हवालदार चेतन गज्जलवार, नितेश महात्मे, किशोर वाकाटे, अमोल सावे, प्रफुल गारघाटे, प्रमोद डबारे यांनी केली आहे.



# जिल्हाधिका-यांकडून कायदा व सुव्यवस्थेचा आढावा ;महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक - २०२४ च्या पार्श्वभुमीवर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीला जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, सहाय्यक पोलिस अधिक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी नियोमी साटम, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुभाष चौधरी, जीएसटीचे सहायक आयुक्त मोहन खोब्रागडे, आयकर अधिकारी सुरेश चौधरी, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे यांच्यासह सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा होताच जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. मुक्त आणि पारदर्शक वातावरणात सदर निवडणुका घेण्याच्या निवडणूक आयोगाच्या सुचना आहेत.



त्यासाठी जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अतिशय चोख असणे आवश्यक आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान आयकर विभाग, केंद्रीय व राज्य जीएसटी विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, रेल्वे पोलिस, प्रादेशिक परिवहन विभाग, पोलिस विभाग, वन विभाग व इतर यंत्रणांनी आदर्श आचारसंहितेच्या नोडल अधिका-यांशी नियमित संपर्क ठेवावा तसेच समन्वयातून काम करावे.

अवैध रक्कम, दारूचा पुरवठा, संशयित बाबी, ड्रग्ज आदी बाबींच्या जप्तीबाबत निवडणूक आयोगाच्या अतिशय सक्त सुचना आहेत. त्याची काटेकोरपणे अंमलबजाणी करावी. महाराष्ट्र हे प्रगत राज्य असल्यामुळे इकडून तिकडे पैशाची वाहतूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सर्वांनी दक्ष असावे. आपापल्या सुत्रांच्या माध्यमातून गोपनीय माहिती मिळविण्यावर भर द्यावा व योग्य कारवाई करावी. जिल्ह्याच्या सीमेलगतच्या चेक पोस्टवर त्वरीत अधिकारी - कर्मचा-यांची नियुक्ती करावी. तपासणी दरम्यान एखादे वाहन पकडले तर त्याचा पुर्वइतिहास तपासावा. जिल्ह्यात येणारे पार्सल तसेच बस आणि ट्रॅव्हल्समधून होणारी पार्सल वाहतूकीची तपासणी करावी.

विविध विभागांनी करावयाची कारवाई : निवडणूक प्रक्रियेदरम्यान संशयीत बाबींची जप्ती प्रकरणे वाढविणे आवश्यक आहे. यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने गोपनीय माहिती गोळा करावी. अवैध व बनावट दारुवर गांभिर्याने लक्ष ठेवावे. गुटखा, ड्रग्ज प्रतिबंधित वस्तुंची तपासणी करावी. जिल्ह्यात अचानक एखाद्या वस्तुची मोठ्या प्रमाणात आवक वाढली असल्यास जीएसटी विभागाने सदर बाब प्रशासनाला कळवावी. आयकर विभाग व प्रादेशिक परिवहन विभागाने नागपूर, हैद्राबाद, छत्तीसगड मधून येणा-या ट्रॅव्हल्स चेक कराव्यात. सर्व बँकांनी संशयास्पद व्यवहारांवर बारकाईने लक्ष ठेवावे. अचानक मोठ्या प्रमाणात पैशांचे व्यवहार होत असेल तर निवडणूक खर्च पथकाला माहिती द्यावी. पैसे ट्रान्सफर करतांना संबंधितांची कागदपत्रे अधिकृत असल्याची खात्री करावी.उपविभागीय पोलिस अधिका-यांसाठी विशेष सुचना : मतदान यंत्र व स्ट्राँग रुमच्या सुरक्षाकवचाला सर्वोच्च प्राधान्य असावे. पोलिसांनी आवश्यक सुरक्षाव्यवस्था पुरवावी. यात कोणताही निष्काळजीपणा होऊ देऊ नये. नामांकन प्रक्रियेदरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात केवळ ३ वाहनांना परवानगी द्यावी तसेच उमेदवारांसह एकूण पाच व्यक्तिंनाच आतमध्ये प्रवेश द्यावा. स्ट्राँग रुमला दिवसातून दोन वेळा नियमित भेट देऊन पाहणी करावी. प्रवेश आणि बाहेर जाण्याच्या मार्गावरील सीसीटीव्ही चेक करावे. मतदान केंद्रावर तैनात असलेल्या पोलिस अधिका-यांना सर्व सुचनांबाबत अवगत करावे व प्रशिक्षण द्यावे.

# गोंडवाना विद्यापीठाला 'फिक्की' चा नामांकित ' संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व' राष्ट्रीय पुरस्कार

## गोंडवाना विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

## दिल्लीतील कार्यक्रमात गोंडवाना विद्यापीठ राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

### विद्यापीठाच्या 'एकल ग्रामसभा सक्षमीकरण प्रकल्पाची' राष्ट्रीय स्तरावर दखल

**गडचिरोली । प्रतिनिधी**

'फिक्की' अर्थात 'फेडरेशन ऑफ इंडियन चेम्बर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री' या राष्ट्रीय संस्थेकडून गोंडवाना विद्यापीठाला 'संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व' हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. आज दिल्ली येथे पार पडलेल्या १९ व्या 'फिक्की हायर एज्युकेशन समिट २०२४' या कार्यक्रमात भारतातील ब्रिटिश सरकारच्या उच्चयुक्त श्रीमती लिंडा कॅमरून यांच्या हस्ते गोंडवाना विद्यापीठाला हा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. यानिमित्ताने नेहमीच नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या गोंडवाना विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवल्या गेला आहे.



'फिक्की'या संस्थेने संस्थात्मक सामाजिक उत्तरदायित्व या प्रवर्गातून पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव मागितले होते. गोंडवाना विद्यापीठाने सुरु केलेल्या एकल ग्रामसभा सक्षमीकरण कार्यक्रमाचा या पुरस्कारासाठी ऑनलाईन प्रस्ताव सादर केला होता. या संस्थेने भारतातील सहा विद्यापीठांना सादरीकरण करण्यासाठी बोलाविले, त्यानंतर तीन विद्यापीठांचे नामांकन या पुरस्काराकरिता करण्यात आले. गोंडवाना विद्यापीठाने ग्रामसभा सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गोंडवाना विद्यापीठ राबवित असलेल्या 'गाव तिथे विद्यापीठ', 'सीआयआयआयटी', 'एसटीआरसी', या नाविन्यपूर्ण आणि सामाजिक उपक्रमांचाही 'फिक्की'ने यानिमित्ताने दखल घेत गौरव केला.

गोंडवाना विद्यापीठाने ग्रामसभा सक्षमीकरणासाठी पेसा कायदा, सामूहिक वन हक्क कायदा, जैव विविधता कायदा, वन व्यवस्थापन व संरक्षण, गौण वन उपजव रेकार्ड व अंकेक्षण यांचे प्रशिक्षण देऊन ग्रामसभाना आतापर्यंत २३५ वन व्यवस्थापन आराखडे तयार करण्याकरिता तांत्रिक मदत केली आहे. विद्यापीठाच्या वतीने एकल ग्रामसभा प्रशिक्षण समन्वयक डॉ. नरेश मडावी व डॉ. मनीष उत्तरवार संचालक, 'ननावसा' यांनी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात हा पुरस्कार स्वीकारला.

# शिवम चिखले याची राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील शिवम चिखले याची शालेय राज्यस्तरीय मैदानी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. पुणे येथे झालेल्या विभागीय आर्चरी स्पर्धेत १७ वर्षांखालील वयोगटात विजय मिळवत त्याने राज्यस्तरीय स्पर्धेत प्रवेश केला.


नांदेड येथे १८ व १९ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी ६० मीटर अंतरावर त्याने दोन राऊंडमध्ये अनुक्रमे ३३४ व ३३६ गुण मिळवत एकूण ६७० गुणांची नोंद केली. या यशस्वी कामगिरीत शिवमला महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभागप्रमुख प्रा. राम काळे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांसह वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी शिवमचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# विधानसभा निवडणुकीसाठी ४ हजार ५१२ मतदान यंत्रांची सरमिसळ

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील प्रथमस्तरीय तपासणी झालेल्या ३ हजार ७६३ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ४ हजार ५१२ मतदान यंत्रांची पहिली जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रक्रिया करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी उप जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल पाटील, ईव्हीएम समन्वयक शारदा जाधव, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी गजानन नकासकर आणि विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ४ हजार ५१२ बॅलेट युनिट, ४ हजार ५१२ कंट्रोल युनिट आणि ४ हजार ८८७ व्हीव्हीपॅट यंत्रांची पहिली सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना जिल्हाधिकारी सालीमठ यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

सर्व मतदान यंत्रांची राजकीय पक्षांच्या उपस्थितीत प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण करण्यात आली असून ते सुस्थितीत आहेत.

सर्व विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्राच्या १२० टक्के बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १३० टक्के व्हीव्हीपॅट यंत्र देण्यात येणार आहेत. वितरणानंतर ही यंत्रे संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षा बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. त्या-त्या विधानसभा मतदारसंघातदेखील मतदान केंद्रनिहाय मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे सालीमठ यांनी सांगितले.

# मतदान जागृतीसाठी विद्यार्थ्यांचा उत्साही पत्रलेखन उपक्रम

**वर्धा । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्यासाठी जिल्ह्यात विद्यार्थ्यांचा उत्साही पत्रलेखन उपक्रम राबविण्यात आला आहे. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शाळांमध्ये राबविलेल्या या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये तसेच त्यांच्या कुटुंबांत उत्साह निर्माण केला आहे.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडील, कुटुंबातील सदस्य आणि बाहेरगावी असलेल्या नातेवाईकांना मतदानासाठी प्रोत्साहित करणारी पत्रे लिहिली. एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग नोंदवला, ज्यामुळे मतदान प्रक्रियेतील नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढवण्याचा प्रयत्न यशस्वी ठरला.




उपक्रमाच्या यशासाठी उपजिल्हाधिकारी निवडणूक अनिल गावीत, जिल्हा स्वीप नोडल अधिकारी डॉ. मंगेश घोगरे, सहायक नोडल अधिकारी उत्तम खरात, संजय नवले तसेच सर्व तालुका स्वीप नोडल अधिकारी आणि शाळांतील शिक्षकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यात मतदानाच्या महत्त्वाबाबत जागृतीचे सकारात्मक वातावरण तयार झाले आहे. लोकशाही प्रक्रियेतील सहभाग वाढवणे आणि जबाबदार नागरिकत्वाचा संदेश देण्यासाठी विद्यार्थ्यांनी घेतलेला पुढाकार हा प्रशंसनीय ठरत आहे. २० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारांचा मोठा सहभाग अपेक्षित आहे.

## विधानसभा सार्वत्रिक निवडणूक- २०२४

# विविध प्रसार माध्यमांव्दारे करण्यात येणाऱ्या प्रचाराच्या जाहिरातींचे पूर्व प्रमाणिकरण करणे आवश्यक

**परभणी । लक्ष्मण उजगर**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक - २०२४ च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती (मिडीया सर्टीफीकेशन ॲण्ड मॉनिटरिंग कमिटी) जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली आहे. उमेदवारांमार्फत प्रचारासाठी इलेक्ट्रॉनिक/सोशल मिडीयास देण्यात येणाऱ्या जाहिरांतीचे पूर्व प्रमाणिकरण या समितीमार्फत केल्या जाते. तर मुद्रीत माध्यमातील (प्रिंट मिडीया) जाहिराती मतदानाच्या दिवशी किंवा मतदानाच्या एक दिवस अगोदर प्रकाशित करावयाची असल्यास समितीकडून पूर्व प्रमाणिकरण करून घेणे बंधनकारक आहे, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी रघुनाथ गावडे यांनी सूचित केले आहे.

माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज - टीव्ही चॅनेल, रेडीओ एफएम, आकाशवाणी, सिनेमागृह, सोशल मिडीया तसेच वृत्तपत्रांच्या इ-आवृत्तीतील (जाहिराती) सार्वजनिक ठिकाणी दाखवायच्या दृक-श्राव्य (ऑडिओ -व्हीज्यूअल) जाहिरातींसाठी प्रसारणपूर्व प्रमाणपत्र बंधनकारक आहे. त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज (इंग्रजी किंवा मराठी भाषेतील) दोन प्रतींमध्ये आवश्यक माहिती भरुन सादर केला जावा. अर्जासोबत दोन सीडी/ पेनड्राईव्ह ( सीडीमधील गीत, संवाद, घोषणा यांच्या टंकलिखीत मजकुरासह दोन प्रती - ट्रान्सस्क्रीपट) मिडिया सेंटर (माध्यम कक्ष), जिल्हाधिकारी कार्यालय, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी येथील जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीच्या कक्षात आणून देणे आवश्यक आहे. राजकीय पक्षांच्या जाहिराती राज्यस्तरावीरल समितीकडून प्रमाणित केल्या जातात. विहीत नमुन्यातील अर्ज मिडिया सेंटरमधून प्राप्त करुन घ्यावा.

प्रत्येक ऑडिओ जाहिरात किंवा ऑडिओ-व्हीज्युअल जाहिरात ही स्वतंत्र असावी. एकाच सीडी / पेनड्राईव्हमध्ये एकापेक्षा अधिक जाहिराती असू नयेत. अर्जदाराचे पूर्ण नाव, पत्ता, जाहिरात कोणत्या उमेदवारासाठी आहे. त्याचे नाव, पक्षाचे नाव, जाहिरात कुठे दाखवणार, जाहिरातीचे शीर्षक, जाहिरात निर्मितीचा खर्च, जाहिरातीतील भाषा याचा स्पष्ट उल्लेख असावा. सीडीमधील मजकूर प्रसारण योग्य असावा. इतरांची बदनामी करणारा, जाती-जातींमध्ये, धार्मिक तेढ निर्माण करणारा नसावा. देशविघातक कृत्याला प्रोत्साहन देणारा नसावा. मुद्रीत माध्यमातील (प्रिंट मिडीया) जाहिराती मतदानाच्या दिवशी किंवा मतदानाच्या एक दिवस अगोदर प्रकाशित करावयाची असल्यास जिल्हस्तरीय समितीचे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. एखादी बातमी पेड न्यूज आहे का हे तपासून उचित कारवाई करण्याचे कामही समिती करते. पेड न्यूज म्हणजे काय ? -- पैसे देऊन अथवा वस्तुच्या बदल्यात माध्यमांमध्ये (प्रिंट/इलेक्ट्रॉनिक्स) प्रसारीत किंवा प्रकाशित वृत्त किंवा विश्लेषण. स्पर्धात्मक प्रकाशनामध्ये छायाचित्रे आणि शिर्षकासह समान लेख /वृत्त आढळणे. उमेदवाराची प्रशंसा करणारे आणि त्यांची निवडून येण्याची शक्यता वर्तविणारे लेख. वृत्तपत्रांनी पेडन्यूज प्रसिध्द करु नयेत. पेडन्यूजबाबत प्रेस कौन्सिलच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन वृत्तपत्रांनी करणे अपेक्षित आहे, असे मिडिया सेंटरमार्फत कळविण्यात आले आहे

# सुभाष पवार यांना संधी मिळाली तरी त्यांना मुरबाडात फिरकू देणार नाही - शैलेश वडनेरे

**बदलापूर । प्रतिनिधी**

मुरबाड विधानसभा मतदारसंघात उमेदवारीसाठी मोठा संघर्ष दिसून येत आहे. सध्या या मतदारसंघाचे आमदार भारतीय जनता पक्षाचे असल्याने आगामी निवडणुकीतही ही जागा भाजपकडे जाण्याची शक्यता आहे. महायुतीतील शिवसेना (शिंदे गट) आणि महाविकास आघाडीतील अनेक इच्छुक उमेदवारांनी आपली दावेदारी स्पष्ट केली आहे. याच पार्श्वभूमीवर सुभाष पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रवेशाच्या चर्चांना जोर आला आहे. ते तुतारी चिन्हावर निवडणूक लढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

शरद पवार गटातून उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या शैलेश वडनेरे यांनी पत्रकार परिषद घेऊन या चर्चेचे खंडन केले. महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि इतर मित्रपक्षांसह संभाजी ब्रिगेड व विविध संघटनांनी वडनेरे यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शवला आहे. वडनेरे यांच्या उमेदवारीचा अंतिम निर्णय लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

वडनेरे यांच्या कार्यालयाबाहेर मोठ्या प्रमाणात समर्थकांची गर्दी झाली होती. समर्थकांनी महाविकास आघाडीकडून वडनेरे यांनाच उमेदवारी मिळावी, अशी मागणी केली. वडनेरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, माझ्या उमेदवारीला शरद पवार गट, उद्धव ठाकरे गट, काँग्रेस, संभाजी ब्रिगेडसह अनेक संघटनांचा पाठिंबा आहे, याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो. पक्षात तीन इच्छुक उमेदवार असले तरी ज्याला पक्ष संधी देईल, त्या उमेदवारासाठी मी प्रामाणिकपणे काम करीन. मात्र बाहेरून आलेल्या उमेदवारांसाठी पक्षात नो-एंट्री आहे, यावर आमची वरिष्ठांशी चर्चा झाली आहे.

वडनेरे यांनी सुभाष पवार यांच्या प्रवेशास तीव्र विरोध व्यक्त करत म्हटले, पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मी स्वतः सुभाष पवार यांचा विरोध करतो. आम्ही त्यांना उमेदवारी मिळवून देणार नाही आणि पक्षही त्यांना संधी देणार नाही, याचा मला विश्वास आहे. याबाबत सुप्रिया सुळे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाली आहे. त्यांनी मला मतदारसंघात काम सुरू ठेवण्यास सांगितले आहे. जरी पक्षाने सुभाष पवार यांना संधी दिली, तरी आम्ही त्यांना मुरबाडात फिरकू देणार नाही.

या आक्रमक भूमिकेमुळे मुरबाड विधानसभा निवडणुकीतील संघर्ष अधिकच चुरशीचा होणार आहे.




# प्रगतशील शेतकरी सुनील घाटुळे यांनी नातीचा वाढदिवस अनाथाश्रमात साजरा करून दिला सामाजिक संदेश

**मोहोळ । प्रतिनिधी**

वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतींमध्ये बदल होत असताना समाजाला एक वेगळा संदेश देण्याचा प्रयत्न अनगर (ता. मोहोळ) येथील प्रगतशील शेतकरी आणि घाटुळे नर्सरी बिझनेसचे मालक सुनील घाटुळे यांनी केला आहे. त्यांनी आपल्या नातीचा वाढदिवस घरी न साजरा करता अनाथाश्रमात जाऊन गरजूंना मदत करून एक अनोखा आदर्श घालून दिला.



घाटुळे यांनी यावेळी आपल्या नाती वसुंधरा हिचा वाढदिवस मोरवंची (ता. मोहोळ) येथे **आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील प्रसाद मोहिते यांनी पाच वर्षांपूर्वी सुरू केलेल्या प्रार्थना बालग्राम अनाथाश्रमात साजरा केला. त्यांनी आश्रमासाठी स्वयंपाक घरात लागणारी भांडी आणि अन्य आवश्यक साहित्य भेट दिले.

सामाजिक उपक्रमातून साजऱ्या या वाढदिवसाला आश्रमातील लहान मुले आणि वृद्धांनी गीत गाऊन आणि औक्षण करून वसुंधराला शुभेच्छा दिल्या. सुमारे पन्नास लोकांच्या उपस्थितीत झालेल्या या सोहळ्याने वातावरणात आनंद आणि समाधान भरून राहिले होते.

प्रसाद मोहिते यांनी घाटुळे कुटुंबाच्या या उपक्रमाचे स्वागत करत त्यांच्या सामाजिक विचारांचे आणि कृतींचे कौतुक केले. त्यांनी सांगितले की, घाटुळे यांचा हा उपक्रम इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल.

सुनील घाटुळे हे मागील दोन वर्षांपासून कुटुंबातील कुणाचाही वाढदिवस अनाथाश्रम किंवा वृद्धाश्रमात साजरा करून गरजूंना उपयोगी वस्तू भेट देण्याची परंपरा पाळत आहेत. फ्लेक्सबाजी, महागड्या पार्ट्यांऐवजी सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून आनंद साजरा करणे हा त्यांचा ध्यास आहे.

वाढदिवसासारख्या खास प्रसंगांना समाजोपयोगी कार्याशी जोडून त्यांनी एक सकारात्मक संदेश दिला आहे. घाटुळे यांचा हा उपक्रम समाजातील इतर कुटुंबांसाठी आदर्श ठरेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

# आमदार पंकजा मुंडे यांचे शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील भाजप उमेदवारासाठी आवाहन



**दिवटे । प्रतिनिधी**

शेवगाव-पाथर्डी मतदारसंघ हा आमदार पंकजा मुंडे यांच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा मतदारसंघ आहे. बुधवारी आमदार मोनिका राजळे यांच्यासह एक शिष्टमंडळ मुंबईत गेल्यावर मुंडे यांनी भाजपच्या उमेदवाराला निवडून देण्याची आव्हान केली.

शिष्टमंडळात भाजप तालुकाध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, माजी नगराध्यक्ष अभय आव्हाड, बाळासाहेब गोल्हार, धनंजय बडे, संजय कीर्तने, नारायण पालवे, अमोल गर्जे, मुकुंद गर्जे, अप्पा शिरसाट यांचा समावेश होता. मुंडे यांनी स्व. गोपीनाथ मुंडे यांना मानणाऱ्या मोठ्या वर्गाचा उल्लेख केला, जो भाजपच्या उमेदवाराची निवड करण्यास महत्त्वाचा ठरू शकतो.

८नुकत्याच झालेल्या विधानपरिषदेच्या निवडणुकीत भाजपने मुंडे यांना आमदार बनवून त्यांच्यावर विश्वास टाकला आहे. या मतदारसंघात उमेदवार निवडून आणण्याची जबाबदारी मुंडे यांच्यावर टाकण्यात आलेली आहे.

मुंडे यांनी शिष्टमंडळाशी चर्चा करताना मतदारसंघातील परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी विचारले की, प्रतिस्पर्धी उमेदवार कोण आहेत, महिलांची संख्या किती आहे, लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांची संख्या कशी आहे आणि गेल्या पाच वर्षांत कोणत्या योजनांची अंमलबजावणी झाली आहे. त्यांनी प्रचाराच्या तयारीला सुरवात करण्याचे आदेश दिले आणि विधानसभेच्या रणधुमाळीत प्रचारसभा घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

या सर्व चर्चांमुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पंकजा मुंडे यांच्या नेतृत्वाखाली मतदारसंघात कठोर मेहनत करण्याचे आश्वासन दिले आहे.

# जि.प.प्राथमिक शाळा पाडळीचे विद्यार्थी गुणवत्ता शोध चाचणीमध्ये यशस्वी



**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद सोलापूर आणि पंचायत समिती शिक्षण विभाग करमाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय विद्यार्थी गुणवत्ता शोध चाचणी २४-२५ स्पर्धेत पाडळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. या स्पर्धेत पाडळी शाळेतील विद्यार्थ्यांची पोथरे केंद्रात निवड झाली आणि त्यांनी तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेत भाग घेतला.

मोठ्या गटात पाडळी शाळेने तृतीय क्रमांक मिळवून आपल्या गावाचे नाव उंचावले. याबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देवून गौरवण्यात आले. विजयी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, विस्ताराधिकारी मिनीनाथ टकले, नितिन कदम, केंद्रप्रमुख निशांत खारगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आणि सर्व सदस्य, सरपंच उपसरपंच, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन, गावातील ग्रामस्थ आणि मुख्याध्यापक यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# भंडारा ता.राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत विधानसभा निवडणुकीची चर्चा

**भंडारा । प्रतिनिधी**

१७ ऑक्टोबर रोजी भंडारा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांची बैठक जिल्हाध्यक्ष नानाभाऊ पंचबुध्दे आणि प्रदेश महासचिव धनंजय दलाल यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली. या बैठकीचे आयोजन तालुका अध्यक्ष नरेंद्र झंझाड आणि तालुका कार्याध्यक्ष आरजु मेश्राम यांनी केले.

या बैठकीत आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवाराला समर्थन देण्याचा ठराव एकमताने करण्यात आला. भंडारा विधानसभेकरिता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला स्वतःचा उमेदवार देण्यात यावा, अशी मागणी भंडारा विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्त्यांकडून वरीष्ठांना करण्यात आली. तथापि, महायुतीच्या कोणत्याही उमेदवाराला पाठिंबा देण्यात येईल, असे ठरविण्यात आले.




या बैठकीत प्रमुख उपस्थितांमध्ये सर्वश्री यशवंत सोनकुसरे, रत्नमाला चेटुले, प्रभाकर बोदेले, कीर्ती गणविर, रुपेश खवास, नागेश भगत, वामन शेंडे, जनराज मस्के, होमदास वरठे, महेश निंबार्ते, मंगेश रेहपाडे, नरेश येवले, सुनिल भोपे, शालिक कागदे, रजनिश बन्सोड, उत्तम कळपाते, विकेश मेश्राम, संजय लांजेवार, बंडु चेटुले, महेश जगनाडे, सारंग घारगडे, विलास खांदाळे, विजय ईश्वरकर, हिरामण साठवणे, निरज शहारे, मदान भुरले, योगराज येलमुले, अरुण मेश्राम, सुभाष तितिरमारे, राजेश डोरले, संघमित्र चव्हाण, प्रेम तुमसरे, रामरतन वैरागडे यांचा समावेश होता. याशिवाय, फार मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.या बैठकीने भंडारा तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये एकजूट आणि उत्साह निर्माण केला असून, आगामी निवडणुकीसाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन करण्यात आले.

# गणवेश वितरणात विलंब,विद्यार्थ्यांचे प्रश्न अनुत्तरीत

**नांदेड । बालाजी पाटील**

राज्य सरकारने मोठ्या गाजावाजात सुरू केलेल्या 'एक राज्य एक गणवेश' उपक्रमाला कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताने बासनात गुंडाळण्यात आले आहे. हदगांव तालुक्यातील एकाही शाळेतील विद्यार्थ्यांना अद्याप मोफत गणवेश मिळालेले नाहीत, ज्यामुळे शाळेतील विद्यार्थी शिक्षकांना प्रश्न विचारत आहेत, गुरुजी, आम्हाला गणवेश कधी मिळणार?

या वर्षी शालेय शिक्षण विभागाने 'एक राज्य एक गणवेश' या नवी धोरण राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार, राज्यातील सर्व सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी एकच रंगाचा गणवेश देण्यात येणार आहे. परंतु, कापड पुरवठ्याचे कंत्राट एका गुजराती कंपनीकडे देण्यात आले आहे, आणि या कंपनीने अद्याप कापडाचा पुरवठा केला नाही. त्यामुळे शालेय



व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांना विश्वासात न घेतल्याने शिक्षकांना ही गंभीर समस्या भेडसावत आहे.गणवेश वितरणासाठी शालेय व्यवस्थापन समितीची भूमिका महत्त्वाची आहे, परंतु गट शिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदच्या शिक्षणाधिकारी यांनी मनमानी व दडपशाही चालवल्यामुळे हदगाव तालुक्यातील एकही शाळेतील समितीला विश्वासात घेतलेले नाही.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण साधण्यासाठी २००३-०४ पासून सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याची योजना सुरू करण्यात आली होती. केंद्र सरकारने २०१८-१९ पासून तीन योजनांचे एकत्रीकरण करत समग्र शिक्षा अभियान सुरू केले आहे, ज्यांतर्गत अनुदान उपलब्ध केले जाते. शिक्षणाधिकारी सविता बिरगे यांच्यानुसार, महिला आर्थिक विकास महामंडळाकडे गणवेशाच्या शिलाईचे काम देण्यात आले आहे, परंतु अद्याप कापड शिलाईसाठी पाठवलेले नाही. शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष अहेमद चाऊस यांनी कंत्राटदारावर कारवाईची मागणी केली आहे.

सध्याच्या परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या हक्कांचे उल्लंघन होत आहे. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना गणवेश उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे, अन्यथा शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होईल.

# मराठा सेवा संघाने राजाभाऊ कदम यांचा मराठा मित्र पुरस्कार आणि शिवचरित्र देऊन केला सन्मान




**सोलापूर । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघाच्या ३४ व्या वर्धापन दिनानिमित्त १३ ऑक्टोबर रोजी बहुजन संघर्ष सेनेचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ कदम यांना विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल मराठा मित्र पुरस्कार आणि शिवचरित्र देऊन सन्मानित करण्यात आले.

या सन्मान सोहळ्यात मराठा सेवा संघाचे केंद्रीय सदस्य उत्तमराव माने आणि क्लास वन अधिकारी मनोज राऊत यांच्या हस्ते राजाभाऊ कदम यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमात मराठा सेवा संघाचे तालुका अध्यक्ष सचिन काळे, यश कल्याणी सेवा भावी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे पाटील तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. सदर कार्यक्रम यश कल्याणी सेवाभावी संस्थेच्या भरगच्च हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. राजाभाऊ कदम यांच्या कार्याबद्दल उपस्थितांनी प्रशंसा व्यक्त केली आणि त्यांचे सामाजिक कार्य समाजासाठी आदर्श असल्याचे मानले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .